# मुंबई विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

वेबसाईट :-www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**

पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२३-२४/८०८
दिनांक : १३.१०.२०२३

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**विषय : '' मेरी माटी मेरा देश '' कार्यक्रमातंर्गत अमृत कलश संकलन व सेल्फी अपलोड करणेबाबत.**

**संदर्भ :** रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.रासेयो-२०२३/प्र.क्र.१७१/साशि-७, दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजीचे पत्र.

महोदय/ महोदया,

उपरोक्त संदर्भाधिन शासनाच्या परिपत्रकानुसार ''मेरी माटी मेरा देश'' कार्यक्रमातंर्गत अमृत कलश संकलन गती वाढविण्याच्या दृष्टीने प्रत्येक महाविद्यालयात अमृत कलश यात्रा व सेल्फी फोटो पोर्टलवर अपलोड करण्याचा उपक्रम राबविण्यात यावा. संकलित केलेल्या अमृत कलशाची यात्रा महाविद्यालय परिसरात काढून यात्रेचा फोटो https://merimatimerades.gov.in/institute-login वर अपलोड करण्यात यावा, तसेच महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांने माती हातात घेऊन सेल्फी फोटो काढावा व तो https://selfiewithmerimaati.in/photoupload/ या लिंक वर अपलोड करण्यात यावा.

कृपया या प्रकरणी आपण वैयक्तीक पातळीवर महाविद्यालयात उपक्रम राबविण्यासाठी लक्ष देऊन रासेयो कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक व इतर विद्यार्थी यांना या उपक्रमात सहभागी करून अमृत कलश यात्रा काढण्यात यावी व जास्तीत जास्त **सेल्फी फोटो** लिंकवर अपलोड करावेत. आपल्या महाविद्यालयांचा विहित नमुन्यात अहवाल या कार्यालयास पाठविण्यात यावा.

**सोबत :** अहवालाचा विहित नमुना

**आपला**

**सुशील शिंदे**
**विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)**

**- - s d - -**
**सुधीर पुराणिक**
**संचालक, रा.से.यो., मुंबई विद्यापीठ**

**प्रत :** सर्व रासेयो जिल्हा समन्वयक, मुंबई विद्यापीठ यांनी आपआपल्या विभागात/जिल्हयामध्ये महाविद्यालयात सदर उपक्रम राबविण्यास मार्गदर्शन करावे व संबंधीत अहवाल दिलेल्या नमुन्यात या कार्यालयास पाठवावा.